Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 28TH JANUARY 1897.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८९७ चा आक्टाचा मसुदा नंबर २७.

**माल गुप्तपणें दुसऱ्याच्या नांवावर करून आपल्या धनकोंचे हक्क रिणकोंस बुडवितां येऊं नयेत ह्मणून, तसा माल तबदील करून देण्याबाबदचे व त्याची कांहीं व्यवस्था करण्याबाबदचे कित्येक व्यवहार नोंदणें भाग पाडण्याविषयीं ठराव करण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

माल गुप्तपणें दुसऱ्याच्या नांवावर करून आपल्या धनकोंचे हक्क रिणकोंस बुडवितां येऊं नयेत ह्मणून, तसा माल तबदील करून देण्याबाबदचे व त्याची कांहीं व्यवस्था करण्याबाबदचे कित्येक व्यवहार नोंदणें भाग पाडण्याविषयीं ठराव करणें ज्या अर्थीं योग्य आहे, त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

१. (१) ह्या आक्टास, सन् १८९६ चा हिंदुस्थानचा बिल्स आफ् सेल (सरखतां) बाबद आक्ट असें ह्मणावें; लहान सरनामा, व्याप्ति, अमलांत येणें व मुदत.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो, स्थानिक सरकार, सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, फर्मावील तेवढ्याच स्थानिक प्रदेशांत व त्या तारखांपासून अमलांत येईल.

२. ह्या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "बिल ऑफ् सेल (सरखत)" ह्या संज्ञेचा अर्थ, मालाची विक्री, गहाण, अगर तबदील करून देण्याचा इतर व्यवहार ज्यामध्यें दाखल असेल, अगर ज्यावरून त्या मालावर कोणताही बोजा उत्पन्न होत असेल, असा दस्तऐवज, असा आहे; आणि तींत, माल धरण्याच्या लैसेन्साचा समावेश होतो.

(२) "माल" ह्मणजे, पैका शिवायकरून इतर दृश्य अशी सर्व जंगम मिळकत; आणि

(३) "दिवाळें निघाल्या वेळचा असैनी" ह्या संज्ञेंत, त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वयें एकाद्या नादाराची किंवा दिवाळें निघालेल्याची इस्टेट ज्या कोणत्याही मनुष्यांत निविष्ट झालेली असेल, त्या मनुष्याचा समावेश होतो.

कित्येक व्यवहार नोंदलेले नसले तर ते रद्द समजणें.

३. मालाचा मालक (ज्यास ह्यांत पुढें देणारा असें ह्मटलें आहे) जेव्हां त्या मालावरची मालकी विकील, गहाण ठेवील, अगर इतर रीतीनें तबदील करून देईल, किंवा त्याच्यावर कोणताही बोजा उत्पन्न करील, किंवा तो माल जप्त करण्यास लैसेन्स देईल, आणि तो माल अशा देणाराच्या दिसत्या कबज्यांत राहील, तेव्हां कलम ४ ह्यांतील ठराव लागू राहून, आणि खालील शर्ती पाळण्यांत आल्या नसल्या तर, सदर्हू प्रकारची विक्री अगर इतर व्यवस्था, अशा देणाराचा बजावणी करणारा धनको अगर त्याचा दिवाळें निघाल्या वेळचा असैनी याच्या संबंधानें रद्द समजली जाईल; सदर्हू शर्ती येणेंप्रमाणें:—

(१) ती विक्री अगर इतर व्यवस्था एका बिल ऑफ् सेलांत दाखल असली पाहिजे;

(२) तें बिल ऑफ् सेल, ती विक्री अगर इतर व्यवस्था पुरी झाल्यावर सात दिवसांच्या आंत नोंदलें पाहिजे.

**खुलासा.**—मालाचा कायदेशीर कबजा दुसऱ्या कोणत्याही मनुष्यानें घेतला असला किंवा तो कबजा त्यास दिला असला तथापि जोंपर्यंत तो माल, देणाराच्या वहिवाटींतील कोणत्याहि घरांत, वखारींत, इमारतींत, कामांवर, जमिनीवर किंवा इतर ठिकाणावर राहील अगर असेल, किंवा त्याचा कोणत्याहि प्रकारच्या जागेंत देणारा उपयोग करीत असेल अगर उपभोग घेत असेल तोंपर्यंत तो माल देणाराच्या "दिसत्या कबज्यांत" आहे असें मानलें पाहिजे.

### उदाहरण.

अ आणि ब हीं नवरा बायको आहेत. अ हा एका न नोंदलेल्या लेखावरून आपलें घरगुती सामान बच्या नांवावर तबदील करून देतो. जोंपर्यंत अ आणि ब हीं एकत्र राहात आहेत तोंपर्यंत तें सामान अच्या दिसत्या कबज्यांत राहतें व तें त्याच्या कर्जाबद्दल हुकुमनाम्याची बजावणी करून घेतां येतें.

व्यापारासंबंधी व्यवहार वगैरेंबद्दल अपवाद.

४. या आक्टांतील कोणताही ठराव,—

(१) मालावर हक्क असल्याचें दाखविणारा व्यापारासंबंधी कोणताहि दस्तऐवज, ह्मणजे, कोणतेंही बिल ऑफ् लेडिंग, डॉक वारंट, वखारवाल्याचें सर्टिफिकेट, माल स्वाधीन करण्याचें वारंट किंवा हुकुम, अगर ज्या दुसऱ्या कोणत्याहि दस्तऐवजाचा, माल कबज्यांत किंवा ताब्यांत असल्याच्या शाबितीबद्दल, मामूल रिवाजाप्रमाणें काम चालत असतां, उपयोग केला असेल, किंवा ज्यावरून, तो दस्तऐवज धारण करणारास, शेरा लिहून अगर स्वाधीन केला असतां, त्यांत दर्शविलेला माल तबदील करून देण्याचा अगर घेण्याचा अख्त्यार प्राप्त होत असेल अगर सदर्हूप्रमाणें अख्त्यार प्राप्त होतो असें ह्मणणें असेल तो दस्तऐवज;

(२) कोणतीही लग्नापूर्वीची विवाहासंबंधी नेमणूक;

(३) ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर लिहून दिलेलें कोणतेंहि बिल ऑफ् सेल;

(४) भाडें, महसूल किंवा इतर कांहीं यासाठीं जप्ती आणण्याचा कोणताहि हक्क, किंवा कायद्यानें दिलेला कोणताहि अग्रपणाचा हक्क;

यांच्या अमलास लागू होतो किंवा व्यत्यय आणतो असें समजूं नये:

आणि कोणतेंहि तारूं किंवा त्यांतील हिसा तबदील करून दिल्याबद्दलचा किंवा त्याची इतर व्यवस्था केल्याबद्दलचा जो व्यवहार, त्या त्या काळीं अमलांत असलेल्या

कोणत्याहि व्यापारी लोकांच्या तारवांबाबद आक्टाअन्वयें, नोंदणें अवश्य असेल त्या व्यवहारास या आक्टांतील कोणताहि ठराव लागू होतो किंवा व्यत्यय आणतो असें समजूं नये.

९. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, इंडिया ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, खालील बाबतींबाबद कानू करण्यास मुखत्यार आहेत, ह्मणजे,— कानू करण्याचा अधिकार.

(अ) नोंदलेलीं बिल्स ऑफ् सेल, किंवा त्यांतील छापून प्रसिद्ध करणें योग्य असेल तो मजकूर, छापून प्रसिद्ध करण्याबाबद;

(ब) बिल्स ऑफ् सेल यांच्या संबंधानें सन १८७७ च्या हिंदुस्थानच्या नोंदण्याच्या आक्टाचे ठराव, जरूर असलेल्या कोणत्याहि फेरफारांनिशीं, लागू करण्याबाबद, आणि तीं नोंदण्याबद्दल व छापून प्रसिद्ध करण्याबद्दल फी ठराविण्याबाबद;

(क) नोंदण्याची मुदत, विशेष प्रसंगीं, वाढविण्याबाबद; आणि,

(ड) साधारणतः, या आक्टाचे हेतु अमलांत आणण्याबाबद.

(२) सदर्हूप्रमाणें केलेल्या कोणत्याहि कानूंत वेळोवेळीं त्याच रीतीनें फेरफार करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार आहे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

---

एका व्यापाऱ्यानें आपल्या पेढीवाल्यांना तारण ह्मणून आपल्या सगळ्या विक्रीच्या मालाच्या संबंधानें एक बिल ऑफ् सेल दिलें होतें, व तें बिल दिल्याबद्दल देणाराच्या इतर धनकोंस कांहींच कळून न येतां तें कांहीं वर्षेंपर्यंत उघडपणें चालत होतें, पण तें बिल त्यानें मुळींच नोंदलें नव्हतें ह्या गोष्टीकडे सन १८९४ सालीं हिंदुस्थान सरकारचें लक्ष्य पोंहोंचलें. सन १८४८ चा हिंदुस्थानचा नादारीबाबद आक्ट (व्हिक्टोरिया राणीच्या कारकिर्दीच्या ११ व्या व १२ व्या वर्षांतील च्याप्टर २१) याचीं "मानलेल्या धनीपणाबाबद रकम" (कलम २३) ही फक्त इलाका शहरांस व नादाराच्या धनकोंस लागू असून तिच्यांत, १ ल्या जेम्स राजाच्या कारकिर्दीपासून इंग्लंडच्या प्रत्येक नादारीबाबदच्या आक्टांत जो ठराव अगदीं क्षुद्र फेरफारानिशीं दाखल केलेला आहे तो ठराव दाखल केला आहे; परंतु इंग्लंडांत त्याचा पारिभाषिक व कोत्या दृष्टीनें अर्थ करण्यांत आला असल्या कारणानें तेथें त्यास पुरवणीदाखल बिल्स ऑफ् सेल आक्ट्स व इतर कायदे करणें अवश्य असल्याचें आढळून आलें आहे. हिंदुस्थानांत, इंडियाचा करारांविषयीं आक्ट (सन १८७२ चा ९ वा) याचीं कलमें १०८ व १७८ हीं जेथवर लागू आहेत तेथवर त्यांवरून मालाच्या दिसत्या मालकानें खऱ्या मालकाची संमति घेतली नाहीं तथापि त्यासच तो माल विकतां किंवा गहाण ठेवतां येतो, व त्यांमध्यें धनकोंच्या संबंधानें कांहींच उल्लेख नसल्यामुळें, त्यांचें सन १८४८ च्या हिंदुस्थानच्या नादारीबाबद आक्टाच्या २३ व्या कलमावरून जें फारच थोडें व कांहींसें संशयात्मक रीतीनें संरक्षण होतें तेवढें खेरीज करून, त्यांची या देशांत मुळींच दाद लागत नाहीं. यास्तव कायदा करण्यास उघड कारण झालें आहे असें हिंदुस्थान सरकारास दिसून आलें, आणि तेव्हांपासून सदर्हू सगळ्या विषयाच्या संबंधानें सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांशीं व निरनिराळ्या स्थानिक सरकारांशीं आणि आड्मिनिस्ट्रेशनांशीं पत्रव्यवहार करण्यांत येऊन त्यांची सल्ला घेण्यांत आली. याचा परिणाम असा झाला कीं वर सांगितल्याप्रकारें मिळकत दुसऱ्याच्या नांवावर जी गुप्तपणें करून देण्यांत येते त्यापासून बजावणी करणाऱ्या धनकोंचा व नादारांच्या धनकोंचा बचाव होण्यासाठीं हिंदुस्थानांत कायद्याची आवश्यकता आहे असें सर्वांचें एकमत असल्याचें दिसून आलें. कोणत्या प्रकारचा कायदा असावा याबाबद बारकाईनें विचार करण्यांत आला असून, जो मसुदा आतां कौन्सिलापुढें आणण्याचें योजिलें आहे तो समर्पक धोरणावर करण्यांत आला आहे व त्याच्या योगानें इष्ट हेतु सिद्धीस जाईल असें वाटत आहे. त्यांतील मुख्य ठराव अशा मजकुराचा आहे कीं, जेव्हां कोणी मनुष्य आपली जंगम मिळकत विकील किंवा तिजवर बोजा उत्पन्न करील आणि उघडपणें त्या मिळकतीच्या दिसत्या मालकाप्रमाणें तिचा कबजा धारण करील, तेव्हां सदर्हूप्रमाणें

विकल्याबद्दल किंवा बोजा उत्पन्न केल्याबद्दल लेख होऊन तो लेख योग्य रीतीनें नोंदण्यांत न आल्यास, ती मिळकत, बजावणी करून, किंवा दिवाळें काढल्या वेळच्या असैनीनें, घेतली जाण्यास पात्र होईल; परंतु सदर्हू मसुदा, देणारा व घेणारा यांच्या दरमियानच्या कोणत्याहि व्यवहाराच्या कायदेशीरपणास कोणत्याच प्रकारें नडत नाहीं. उदीमासंबंधी मामूल व्यवहारांस हरकत होऊं नये ह्मणून, बिल्स ऑफ् लेडिंग, डॉक् वारंटें, वगैरे, यांसारखे, हक्क असल्याचें दाखविणारे व्यापारासंबंधी दस्तऐवज नोंदण्याची माफी असली पाहिजे, आणि ह्मणूनच ते, लग्नापूर्वीच्या विवाहासंबंधी नेमणुका, ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर लिहून दिलेलीं बिल्स ऑफ् सेल, जप्ती आणण्याचे हक्क व कायद्यानें मुद्दाम दिलेले अग्रपणाचे हक्क यांसहित, योजलेल्या कायद्याच्या अमलापासून दूर करण्यांत आले आहेत. तसाच सदर्हू मसुद्याच्या ९ व्या कलमावरून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्यासाठीं, जरूर पडेल तेव्हां त्या मसुद्यांतील ठरावांस पुरवणीदाखल कानू करण्याचा, अधिकारहि घेण्यांत आला आहे.

तारीख १९ वी डिसेंबर, सन १८९६. (सही) एम् डी. चामर्स.

जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.